# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/01/2023 (गुरूवार) सकाळ

---

### चोरी

**१) पो.स्टे. भिवापुर** :– अंतर्गत ३४ कि.मी. अंतरावरील मौजा नांद येथे दिनांक ०४/०१/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सौ. भारती चंद्रशेखर सिंग, वय ३९ वर्ष, रा. भिवापुर हिला सकाळी ०९.०० वा. श्री. दांडेकर यांनी फिर्यादीला फोन करून सांगीतले की, नांद येथील टॉवरचे सेल्टर बॉक्सचे दार वाकवुन त्या मधील ठेवलेले २४ नग बॅटरीचे सट एकुण किंमती अंदाजे २४०००/– रू. तसेच ३ नग ट्रे प्रत्येकी १०००/– रू. एकुण किंमती ३०००/– रू. व ३ नग कंबायनर प्रत्येकी किमती १०००/– रू एकुण किंमती ३०००/– रू. असा एकुण किंमती ३०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने वायराची तोडताड करून नुकसान करून चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १२७० अशोकसिंग ठाकुर मो. नं. ९८२२६४३७७९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा डुमरीकला येथे दिनांक ०३/०१/२०२३ चे रात्री २१.०० वा. ते दिनांक ०४/०१/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– उमेश वासुदेव घोडमारे, वय ३६ वर्ष, रा. डुमरीकला हिच्या खुल्या शेतातुन कोणीतरी अज्ञात आरोपीने शेतातील तारेचे कुंपनाचे लोंखडी गेटचे कुलुप तोडुन शेतात ठेवलेले धानाचे ३२ बोरे अंदाजे २९ क्विंटल किंमती अंदाजे ६०,०००/–रू. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. १९६१ अनिल चंदनबटवे मो. क्र. ८६००३६४८२० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**